## परिपत्रक :

**विषयः-म्हाडा साहित्य चाचणी प्रयोगशाळेसाठी विकसीत करण्यात आलेल्या ऑनलाईन संगणकीय प्रणालीचा वापर करणेबाबत.**

# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

गृहनिर्माण भवन, कलानगर,वांद्रे (पूर्व), मुंबई -४०००५१.

---

**जा.क्र.:** उपमुअ/का.अ.-१/दवगुनिक/प्रा/सा.चा.प्र./८६१ /२०१९
दिनांक : २९/०८/२०१९

**संदर्भः** उपमुख्य अभियंता/साचाप्र यांचे परिपत्रक क्र.४०८, दि.०३/०४/२०१८

म्हाडा अंतर्गत विविध योजनेच्या बांधकामासाठी वापरात येणाऱ्या बांधकाम साहित्याचा दर्जा तपासण्यासाठी व योग्य त्या दर्जाच्या साहित्याचा प्रत्यक्ष बांधकामात वापर व्हावा यासाठी साहित्य चाचणी प्रयोगशाळेची स्थापना करण्यात आली आहे. त्यासाठी सदरहु प्रयोगशाळेमार्फत म्हाडा अंतर्गत विविध विभाग तसेच शासकीय, निमशासकीय व इतर संस्थामार्फत प्राप्त झालेल्या साहित्याची चाचणी करुन देण्यात येते.

म्हाडा साहित्य चाचणी प्रयोगशाळेचे अत्याधुनिकीकरण करण्याच्या अंतर्गत मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राधिकरण यांचे शुभहस्ते दि.०१/०४/२०१९ रोजी साहित्य चाचणी प्रयोगशाळेच्या कार्यपध्दतीच्या संगणकीकरण प्रणालीचे उद्‌घाटन करण्यात आले आहे. त्यानुसार साहित्य चाचणी प्रयोगशाळेच्या कार्यपध्दतीचे संपूर्ण संगणकीकरण करण्यात आले आहे.

या अनुषंगाने म्हाडामधील सर्व विभागांना कळविण्यात येते की म्हाडा साहित्य चाचणी प्रयोगशाळेमार्फत राबविण्यात येणाऱ्या संगणकीय प्रणालीचा वापर करण्याबाबत आपल्या अंतर्गत सर्व संबंधीतांना अवगत करावे.

सदरहु संगणकीय प्रणालीचा तपशिल पुढीलप्रमाणे :

१. एजन्सी / ठेकेदार यांनी म्हाडा संकेत स्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे (फक्त एक वेळ).

२. एजन्सी / ठेकेदार यांनी साहित्य चाचणीसाठी ऑनलाईन अर्ज करणे व शुल्क भरणे.

३. प्रयोगशाळेमध्ये बांधकाम साहित्य चाचणीसाठी जमा करणे.

४.साहित्य चाचणीचे अहवाल थेट ईमेलद्वारे संबंधीत विभागाच्या कार्यकारी अभियंता , संबंधीत कंत्राटदार व मुख्य लेखाधिकारी यांना पाठविणे.

उपरोक्त प्रमाणे कार्यन्वित केलेल्या संगणकीय कार्यप्रणालीची माहिती पुस्तिका https://mtl.mhada.gov.in/user/login या म्हाडाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सदरहु संगणकीय प्रणालीमध्ये ग्राहकाने ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावयाचा असल्याने यामध्ये संबंधीतांना एकाच वेळी अनेक अर्ज करणे शक्य होणार आहे. त्यामुळे सदर ग्राहकांचे साहित्य स्विकारणे म्हाडा प्रयोगशाळेस बंधनकारक असणार आहे. सदर परिपत्रकान्वये आपणास कळविण्यात येते की, उपमुख्य अभियंता / दक्षता व गुण नियंत्रण कक्ष /प्राधिकरण यांच्या संदर्भीय परिपत्रकामध्ये नमुद केलेल्या इतर साहित्य चाचणी प्रयोगशाळेंच्याऐवजी प्राधान्याने म्हाडा साहित्य चाचणी प्रयोगशाळेतून बांधकाम साहित्याची तपासणी करण्याबाबत आपल्या अंतर्गत सर्व संबंधीतांना सुचित करण्यात येत आहे.

(सही) 25/7/19
**मुख्य अभियंता-१,**
प्राधिकरण.

**प्रति,**

- मुख्य अभियंता - २,३ /प्राधिकरण.
- वित्त नियंत्रक /प्राधिकरण.
- मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी /प्राधिकरण.

- मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी /प्राधिकरण यांचे स्वियसहाय्यक.

**माहिती व योग्य कार्यवाहीस्तव :**

- उपमुख्य अभियंता- दक्षता व गुण नियंत्रण कक्ष / प्रा., पी.एम.वाय.कक्ष/प्रा., बी.डी.डी./नियोजन/प्रा., बी.डी.डी./मुं.मं.,पी.पी.डी./मुं.मं.,पश्चिम/मुं.मं., पुर्व/मुं.मं.,मुं.झो.सु.मंडळ, कोंकण मंडळ.
- उपमुख्य अभियंता - परिमंडळ - १,२,३,४, मुं.इ.दु.व पु.मंडळ.
- कार्यकारी अभियंता-१/२/दक्षता व गुण नियंत्रण कक्ष /प्राधिकरण.
- कार्यकारी अभियंता- बोरीवली / गोरेगाव /वांद्रे / कुर्ला /शहर / बी.डी.डी./पी.पी.डी.-१/मुंबई मंडळ.
- निवासी कार्यकारी अभियंता /मुंबई मंडळ.
- कार्यकारी अभियंता / विभाग-ए /बी-१/बी-२/सी-१/सी-२/सी-३/डी-१/डी-२/डी-३/ई-१/ई-२/फ-दक्षिण/फ-उत्तर/ग-दक्षिण/ ग - उत्तर//मुं.इ.दु.व पु.मंडळ विभाग,
- निवासी कार्यकारी अभियंता/मुं.इ.दु.व पु.मंडळ विभाग,
- कार्यकारी अभियंता- पश्चिम, पुर्व,शहर / मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ विभाग
- कार्यकारी अभियंता -१/२/३, कोंकण मंडळ.